म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५३९



REFBK-0024514
REFBK-0024514

# पाऊलवाटा

## अनुराधा वैद्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# पाऊलवाटा

सौ. अनुराधा वैद्य

REFBK-0024514
REFBK-0024514

प्रकाशक :
के. विजय अंबाडे
पारिजात पब्लिकेशन्स
ब्लॉक नं. ३, ५७६, शिवाजीनगर
पुणे ४११ ००४
दूरध्वनी : ५२८८१/५४००८

© सौ. अनुराधा वैद्य
'शांतिनिकेतन', खडकेश्वर
औरंगाबाद ४३१ ००१

मुद्रक :
श्री. एस. आर. अग्रवाल
ज्ञानसरिता मुद्रणालय
एरंडवणे, पुणे ४११ ००४

मुखपृष्ठ :
अनिल उपळेकर

मांडणी :
के. विजय अंबाडे

ब्लॉक/छपाई :
व्ही. जोशी ब्लॉक मेकर्स
शनिपार
पुणे ३०

मूल्य : दहा रुपये

प्रकाशन काळ : नोव्हे. १९८४

---

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेखाली अनुदान मिळालेले आहे.

संदर्भ काव्य
२५२९
२४५९८
२८।१२।८५

## मनोगत :

मी काही कुणी थोर कवयित्री नाही. गृहिणीचं साधंसुधं आयुष्य जगतांना जे भावभावनांचे तरंग माझ्या मन:पटलावर उमटले, त्यांना आपोआप शब्दरूप मिळत गेलं. असं नेहेमीच होत गेलं आणि मग वाटलं, शब्दांत व्यक्त झालेल्या या भावनांना, या कवितांना एकत्र करावं आणि रसिकांच्या समोर ठेवावं. जीवनाची वाटचाल करतांना ज्या पाऊलवाटा आपल्याला तुडवाव्या लागल्या तिथे खुडलेल्या भावफुलांची ओंजळ रसिकांना अर्पण करावी. त्या वाटांवरून आपल्या सोबत चार पावलं चाललेल्या वाटसरूंच्या स्मृती अशा बंदिस्त करून ठेवाव्यात. या इच्छेतून हा कवितासंग्रह तयार झाला. रसिकांना तो आवडेल अशी आशा बाळगते.

कविता करणारा माणूस हा इतरांच्या, किंबहुना आप्त, मित्र, स्वकियांच्या टिंगलीचाच विषय होत असतो. ही टिंगल कवीला जास्त–जास्तच अंतर्मुख करते, कवितेच्या अगदी जवळ पोचवते. कवी आणि कविता यांचंच मग एक वेगळं असं विश्व तयार होतं. मला स्वत:ला सुद्धा हा अनुभव आहे. माझं मन आणि कविता यांच्यातला हा संवाद प्रकाशात आणायचं काम माझे पती श्री. शशीकांत वैद्य यांनी केलं. चिटोऱ्या-चिटोऱ्यांवर विखुरलेल्या कविता शोधून काढून निरनिराळ्या मासिका– साप्ताहिकांकडे त्या प्रसिद्धीसाठी पाठवण्यासाठी त्यांनी मला उद्युक्त केलं, नव्हे तशी सक्ती केली.

माझी कवयित्री मैत्रीण सुनेत्रा ओक यांनी ठिकठिकाणी मला काव्यवाचन करायला लावून रसिकांना माझी ओळख करून दिली. त्यांचा स्नेह मला निरंतर लाभावा हीच इच्छा ! के. विजय अंबाडे यांच्या सहकार्यानं पुस्तक तयार झालं. अनिल उपळेकरांनी त्याला मुखपृष्ठाचं झक्क अंगडं टोपडं घातलं. डॉ. सुधीर रसाळ यांनी सुरेख प्रस्तावना लिहून दिली. या सर्वांचे आभार मानून त्यांच्या आपुलकीचा अवमान करत नाही.

–सौ. अनुराधा वैद्य.

पूर्वप्रसिद्धी

अनुराधा, अमरेन्द्र, पारिजात, बहुमत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2529
दा. क्र. 284594
काव्य 22/2/85
ग्रंथ शाखा (स्थानक)

ज्याच्या हातात हात देऊन
जीवनाचा रंगीबेरंगी गोफ विणला
त्या तुलाच !

# स्वागत

सौ. अनुराधा वैद्य यांचा 'पाऊलवाटा' हा पहिलाच कवितासंग्रह. तो महाराष्ट्र सरकारच्या नवोदितांना प्रकाशनार्थ दिल्या जाणाऱ्या अनुदानाने प्रसिद्ध होत आहे. या सरकारी अनुदानामुळे नवोदितांच्या कवितेला एकत्र, संग्रहरूपाने रसिकांसमोर येण्याची संधी मिळत आहे. एरव्ही ही कविता वेगवेगळ्या नियतकालिकांमधून विखुरलेल्या स्वरूपात दुर्लक्षित अशी पडून राहिली असती; हळूहळू वाचकांच्या स्मृतीतून पुसट होत गेली असती, ती या योजनेमुळे संग्रहित होऊ शकली; त्यामुळेच एकत्र रूपात वाचकांच्या मनावर आपला ठसा उमटविण्याची तिला संधी मिळू शकली हे या योजनेचे यश आहे. सौ. अनुराधा वैद्यांच्या कवितेलाही या संग्रहामुळे अशी संधी लाभत आहे.

सौ. अनुराधा वैद्यांची ही कविता जीवनाला सामोरी जाणारी, जीवनातील सुखदुःखे पचवून जीवनावर प्रेम करणारी कविता आहे. जीवनलालसेचा एक उत्कट प्रवाह तिच्यातून वाहतो आहे. नियतीच्या क्रूर पंजाखाली जीवन रक्ताळून जात असते. याची त्यांच्या कवितेला जाणीव असली तरी दुर्वांकुराच्या ईर्षेने जगण्याचे एक ऋण जागत असते, जगण्याचे एक स्वप्न पालवत असते, याचीही या कवितेला खात्री आहे. माणसाची जगण्याची जी एक दुर्दम्य ओढ आहे ती या कवितेतून प्रकट झाली आहे. जगण्याच्या या ओढीमुळेच अनुराधा वैद्य प्रसन्न अशी निसर्ग कविता लिहू शकल्या आहेत. वैशाख हा कडक उन्हाचा महिना. त्यात ऐन दुपार. सारे वातावरण 'गपचिपलेले'. सर्व वृत्ती बधीर करून टाकणाऱ्या अशा या वातावरणातही—

> एक भिंगरी
> घेऊन गिरकी, ऐशी फिरकी
> रुमझुम गाऊन, गाता नाचून
> तोल सावरी...
> वैशाखाचे अनुपम वैभव
> अशी न्याहाळी उत्सुक नयने
> ग्रामीण गौरी...

अशा प्रकारे विरोधी वातावरणातही सुखाचे, सौंदर्याचे कण वेचीत आपले जगणे अर्थपूर्ण बनविण्याची एक आस अनुराधा वैद्यांची कविता प्रकट करते.

जगण्याबद्दलची ओढ ही स्त्रीमनाचे एक नैसर्गिक वैशिष्ट्य आहे. निसर्गाप्रमाणेच स्त्रीही सर्जनाचे कार्य करते. वंशनिर्मितीचे आणि वंशसंवर्धनाचे हे कार्य प्रकृतीने तिच्यावर सोपवले आहे. यातून जगण्याची ही ओढ जन्मतः असते.

सौ. वैद्यांची कविता जगण्याच्या ओढीबरोबरच वंशनिर्मितीच्या व वंशसंवर्धनाच्या प्रेरणाही व्यक्त करते. या कार्यात स्त्रीला जी अर्थपूर्णता लाभत असते ती आपल्या कवितेतून सौ. अनुराधा वैद्यांनी प्रकट केली आहे. विवाहात गौरीहर पुजताना ती बाळकृष्णही पुजते. माहेरहून सासरी येताना हा बाळकृष्ण आपल्या बरोबर घेऊन येते. हा बाळकृष्ण जेव्हा तिच्या कुशीत हसतो तेव्हा आपल्या जीवनाचे सार्थक झाल्याचे तिला जाणवते. एका कवितेत सौ अनुराधा वैद्यांनी म्हटले आहे की–

रेशमाचे तुझें हात
माझ्या गळ्यात पडता
आयुष्याची खरी खरी
आज झाली ग सांगता

स्त्रीच्या ठिकाणी जीवनाबद्दल एक समजूतदारपणा असतो. तिच्या या नैसर्गिक कार्याचा जणू तो एक अपरिहार्य भाग आहे. वैद्यांची कविताही असा एक समजूतदारपणा वारंवार व्यक्त करताना दिसते.

कळीने जरी असते फक्त फुलायचे
कोवळ्या किरणांशी मजेत खेळायचे
साऱ्याच कळ्यांना किरण लाभत नसतात

जीवनातील दुःखमूलक 'विषमता' नीट जाणवून घेणारा हा समजूतदारपणा ही कविता प्रकट करते. आपण सारेच काहीं 'राधा' किंवा 'रुक्मिणी' नसतो; कदाचित् आपण कुब्जाही असतो. राधेला–रुक्मिणीला आणि कुब्जेलाही 'कृष्ण' हवा असतो. राधा–रुक्मिणीला तो मिळतो. कुब्जेला मात्र तो मिळत नाही. सौ. वैद्यांची कुब्जा मात्र यांची खंत करीत नाही. ती सर्व परिस्थिती ओळखून समजूतीने म्हणतें–

जन्मभरी आहे देवा
जोपासला एक ध्यास
तुझ्या सुकोमल हाते
अश्रू एकदाच पूस !

प्रत्येकाला आपआपल्या दुःखाचा क्रूस आपआपल्या खांद्यावर वाहावा लागतो. म्हणूनच परमेश्वराकडून फारशा अपेक्षाही करता येत नाहीत. माध्यान्हीचा अंगार एकटीनेच तुडविताना त्याने फक्त सावलीला मेघ द्यावा अशी मात्र आपली अपेक्षा असते कारण त्याच्या आधारेच जगण्याची ही असोशी टिकून राहते. संसारात प्रियकर पतीसाठी साऱ्या जीवनाचेच अर्ध्य द्यावे लागते. या बदली त्याच्याकडून काय मिळते याचा हिशोब करायचा नसतो. आपल्या जीवनाची ओंजळ त्याच्यापाशी रिती करताना सारे दुःखभोग आपणच भोगायचे असतात. असे एक सुजाण मन मग स्वाभाविकपणे म्हणते–

नाही फाराची अपेक्षा माझ्या मनाच्या विसाव्या
उणीवेचे दुःख माझ्या तुला सांगीन सगळे
ठेव माथ्यावर हात बांध होऊ दे मोकळे
आधाराला तुझ्या येता नको कुशीत वळूस

असा जगण्याला सुसह्य करणारा, जगण्याच्या प्रेरणेचे कोंभ करपून देणारा एक स्वाभाविक समजूतदारपणा ही कविता व्यक्त करते. वंशाचे संगोपन करताना आपल्या वंशाला स्त्री जगायला शिकवते. जगण्याला अर्थपूर्णता देणारा हा समजूतदारपणा ती आपल्या वंशाच्या ओंजळीत टाकते. पिलाला पंख फुटतात आणि पक्षीण त्याला उडायला शिकवते. त्याला स्वतःचे संरक्षण करायला शिकवते. जणू ती त्याला समजून उमजून जगायला शिकवते. सौ. अनुराधा वैद्यांची पक्षीण आपल्या पिलाला म्हणते–

क्षणभराच्या विसाव्याला
बसशील जेव्हा वासून चोच
कुणी काळा डोमकावळा
जरूर तुला मारील टोच
नको भिऊ माझ्या पिला
घायाळ तरी भरारी मार
भिरभिरणारी माया माझी
सहज तुला करील पार.

अशी आहे अनुराधा वैद्यांची कविता. खरे म्हणजे स्त्रीजीवनाचे, स्त्रीमनाचे दर्शन घडविणारी कविता मराठीत खूपच लिहिली गेली आहे. सासर–माहेर यांच्याशी स्त्रीचा अनुबंध, पती, पुत्र, बंधू व माता यांच्याशी तिचे असलेले नाते याचे भरपूर चित्र मराठी कवितेत उमटले आहे. असे जरी असले तरी इंदिरा संतांचा व आणखी एखादा दुसरा अपवाद वगळता कवयित्रींच्या कवितेत फारशी सूक्ष्मता आढळत नाही. स्त्रियांच्या कवितेत अभावाने सापडणारी ही सूक्ष्मता निर्माण होण्याची एक शक्यता सौ. अनुराधा वैद्यांच्या कवितेबाबत जाणवते. हे वरील विवेचनावरून लक्षात येईल त्यासाठी आपल्या अनुभवांचे आकार अधिक निष्ठुर अशा तटस्थतेने निरखण्याची गरज असते. तसेच भाषेतील काव्यनिर्मितीची क्षमता जोखणे आवश्यक असते. सौ. अनुराधा वैद्यांना योग्य दिशा सापडली आहे. त्यांना आपल्या कवितेची नेमकी वाटही सापडेल याची चिन्हे ह्या काव्यसंग्रहातून उमटलेली आहेत.

५ जुलै १९८४

सुधीर रसाळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दे. क्र. २५२१ / २४५१४ / २५।२।८५
नौपाडा शाखा (स्थानक क्र.)

## सृजन

जगन्नाथाच्या रथाबरोबर
सक्तीने फरफटताना
आदिमायेच्या प्रेरणेनं
कुठून तरी झिरपत होतं

नियतीच्या दुष्ट क्रूर
रक्ताळलेल्या पंजाखाली
दुर्वांकुराच्या ईर्ष्येनं
एक ऋण जागत होतं

दुर्दम्य आकांक्षेचा
घट्ट मिटला राजस कळा
खोल खोल आळूमाळू
एक स्वप्न पालवत होतं

## भूल

रुंद खांदे बळकट बाहू
यांची भूल पडली नव्हती
कुरळ्या जुल्फांत गुंतूनही
नजर भानावरती होती

उणीपुरी उंची आणिक
वर्ण तुझा मेघःश्याम
विशाल छाती यांनी मला
केले नाही रे गुलाम

हसऱ्या तुझ्या जिवणीचा
नाही पडला मला मोह
पण सख्या कसे सांगू
तुझ्या नयनांचे डोह

काय त्यात होते नेणे
डोळे तुझे जीवघेणे
गूढपणे रोखलेले
अनामिक संमोहने

नाही नाही भुलणार
मंत्र ओठी असताना
कशी डोही बुडाले रे
इतुकी मी जपताना

## सार्थक

अवघं आभाळच ओथंबलं
होऊन तटतटलेला पान्हा
ओल्या वाऱ्याचा गंध हुंगत
सरसरली एक अनामिक लहर
श्रावण-धारेतलं मीच झाले ऊन्ह
झाले कोसळत्या आषाढातली सर
जेव्हा अस्पर्श मातृत्वाला स्पर्शून गेले
तुझे आर्द्र, सांद्र पवित्र अधर

## तहान

अशी कशी माझी नीज
क्षण मिटेना पापणी
ध्यानी तूच मनी तूच
तूच प्रत्येक स्पंदनी

श्वास आणिक उच्छ्वास
माझा मलाच परका
फक्त तुझाच तुझाच
त्याला ध्यास हा सारखा

भूक तूच, तूच तृष्णा
तूच देह कण-कण
सारी तुझीच तुझीच
मला लागली तहान

## माझ्या पिला

पंख फुटताना माझ्या पिला
पाय होतील जायबंदी
ऊर धपापत धरून ठेवशील
घरट्यापासली झुलती फांदी

पहिली भरारी घेताना
त्राण संपून भुईवर येशील
इवले–इवले मिटून पंख
भविष्याचा वेध घेशील

क्षणभराच्या विसाव्याला
बसशील जेव्हा वासून चोच
कुणी काळा डोमकावळा
जरूर तुला मारील टोंच

नको भिऊ माझ्या पिला
घायाळ, तरी भरारी मार
भिरभिरणारी माया माझी
सहज तुला करील पार

## माझे माहेरवाशिणी

गाई-गोऱ्हचाची बारस
पहिली पणती अंगणी
मनी तुझाच आठव
माझे माहेरवाशिणी

आज धनत्रयोदशी
तेल उटणे आणते
नर्कचतुरदशीला
तुला मूळ मी धाडते

करू लक्ष्मीपूजन
पाडवा नि भाऊबीज
साडी रेशमी भर्जरी
आणू ओवाळणी तुज

घास मायेचा घालून
करीन ग पाठवणी
माझे दारीचे चिमणी
माझे माहेरवाशिणी

## उद्या

आज असली रात्र तरी
उष:काल होणार आहे
विझल्या नेत्र निरांजनी
एक ज्योत तेवणार आहे

अंधाराच्या दर्यामधून
धुंडून धुंडून शब्दरत्नं
एक नवा सूरदास
पुन्हा जन्म घेणार आहे

हजार मोडके हात घेऊन
कोणी एक देवमाणूस
भर जंगलामधे एक
नंदनवन फुलवतो आहे

एका-एका छिन्नभिन्न
भंगलेल्या मूर्तीमधे
पुन्हा शिल्प कोरण्यासाठी
प्रेम-पीयूष शिंपतो आहे

अस्मानाला भिडलेत आज
विज्ञानाचे हजार हात
दूर नाही आता डगर
मिळणार आहे त्यांना साथ

दैवावरती मात होईल
कोणी नाही आता करुण
प्रत्येक दुबळ्या पावलांमधे
जन्म घेणार आहे वरुण

## अन् षंढ झाले अतिरथी

जाहले राऊळ येथे
रावणाचे, अन् सती
जाळिल्या कोंडून आम्ही
हीच अमुची संस्कृती

जाळण्याला पाप झाले
सिद्ध लक्ष्मीचे पती
भ्रष्ट सत्तेला बलाने
अभय हे तर मागती

देश मोडीला निघाला
मोल त्याचे सांगती
द्रौपदीचे वस्त्र फिटते
नाही धावत श्रीपती

हुंदका ओठांत विरतो
चौदिशा अंधारती
आज लज्जा भ्रष्टली
अन् षंढ झाले अतिरथी

## वास्तव

अरे, नको विसरूस की सारे राग
मुळी असे आळवायचेच नसतात
साऱ्याच विराण्या रंगत नसतात

कळीने असते जरी फक्त फुलायचे
कोवळ्या किरणांशी मजेत खेळायचे
साऱ्याच कळ्यांना किरण लाभत नसतात

आयुष्यात आनंदाचे भुईनळेच उडवायचे
कुणीतरी जळूनच अग्निफूल उमलायचे
दुःख अपयश ही दाद मागत असतात

तरंग तर काय, ते तर उठायचेच
किती आले गेले– कसे कुणी मोजायचे
किनाऱ्याशी ते विरायचेच असतात.

## पीस

इवले-इवले एक पीस तरंगणारे
अंगाईच्या स्वरांसारखे कोमल-कोमल
आणि कोवळ्या श्वासांसारखे मंगल-मंगल
तान्हुल्याच्या जावळासारखे भुरभुरणारे

रमणीच्या पापणीसारखे फडफडणारे
लाजभरल्या नजरेसारखे आतुरलेले
मंथरकुरळ्या केसांसारखे मंतरलेले
विरहिणीच्या ओठांसारखे थरथरणारे

मायाभरल्या हातांसारखे गोंजारणारे
संध्याकाळच्या छायासारखे तरल-तरल
वृद्ध कापऱ्या स्पर्शासारखे वत्सल-वत्सल
इवले-इवले एक पीस तरंगणारे

## वंचित

कोवळ्या उन्हासारख्या माझ्या मनाने हे
आणले होते जुईफूल तुझ्यासाठी
एक-एक पाकळी त्याची उलगडताना
अवघ्या देही सुगंधाची झाली दाटी

श्वास भरून फूल माझे हुंगताना
झाले तुझ्या भावनांचे लाख पारवे
लांब क्षितिजाशी होते एक गारुड
तिथे त्यांना लाभले रे पंख हिरवे

बघता बघता दुबळ्या माझ्या ओंजळीतून
थेंब-थेंब सारे सुख गेले झरून
अजून तुला मोह घालतात तेच चकवे
तेच विभ्रम, तेच रुसवे, सारे फसवे

कशासाठी जायबंदी पंख दिलेस ?
मातीवरचे पाय असे नाचवलेस
घरदार अंगण मला परके झाले
अवघेच देठ आता माझे तुटलेले

## शपथ

प्रिया तुझ्या संगतीत
गात्र-गात्र फुललेले
अनंगरंगि रेखिलीस
अंगअंगि बिल्वदले

कापुरसे मन माझे
झाडिलीस चकमक का
अंतरले दोन्ही तीर
भर मध्यावर नौका

उन्मळून उन्मळून
थरथरते ही काया
अन् बिलोरी काचेची
ठिकरी-ठिकरी व्हाया

सांजवेळ दरवळली
मदनबाण घमघमला
चुंबुन घे क्षणक्षण हा
प्रीतीची आण तुला

## चित्र

पाऊलवाटेवरती मळल्या
चिंच एक झालेली गाभुळ
वळणावरती अन् बांधाच्या
किंचित् झुकली वेडीबाभुळ

त्याच पुढे किंचित् पलीकडे
आम्रतरुतली दाट सावली
वाजवी पावा कुणी अनामिक
स्वरांत त्याच्या जादू भरली

झुकल्या फांदीला ओठंगून
मंत्रमुग्ध झाली ही कोणी
चेटुकचेडी ' परी ' हिच्यावर
जादू केली धुंद सुरांनी

ऊन जरीचे स्तब्ध पसरले
पान सळसळे उगाच कोठे
क्वचित् कुठे उडणारा रावा
बाकी सारे चित्रच वाटे

## क्षण

झिरझिरी मेघातून
चंद्रमणी झिरपावा
नक्षी काढीत उडावा
रानपाखरांचा थवा

आणि असाच असावा
शिणशिणीत गारवा
उबदार तुझ्या मिठी
आणि मायेचा ओलावा

ओठ ओठांत असावा
श्वास श्वासांत मिळावा
माझ्या देहाचा करून
तूच पावा वाजवावा

## एक निर्वात सांज

लावलीय सांजवात देवापुढे
हात जोडले मस्तक नमले
वंदन केले – भक्तिभावाविना

भक्तीसाठी नाहीच नमस्कार
आहे फक्त मागण्यासाठी
ज्याच्यासाठी उकलल्या आहेत
पापपुण्याच्या आजवर गाठी

मागण्यात तरी कुठं राहिलाय आता राम !
मागायचं होतं काम आणि निढळाचा घाम
दुभवायची होती सत्याची कास
प्यायचा होता निरागस गोरस

चोचीत–चोचीची गोडी
गिर्रेबाज कबुतरांची जोडी
पण ... ... ... ...
आयुष्याचे गणित एकाच अंकाने चुकले
आणि व्यवहाराच्या चौकटीत अगदी फिट्ट बसले

तसे माझे सारे ठीक आहे
बायको, मुलेबाळे, घरदार, पगार !
फक्त हरपलीय् एक जुईमाळली ओली संध्याकाळ

केव्हाच वारलेत
झुकलेल्या पापणीवरचं दंव टिपणारे हळुवार ओठ

पण आहेत, अजून आहेत त्या क्षणांचे साक्षीदार
तेच पुजायचेत अन् लावायचंय् भूतकाळाचं दार
ते, काळोखी गर्भागारातले स्थितप्रज्ञ देव
अन् बंदच करायचीय ती अनावश्यक देवघेव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५२१
२४५५५
२८२४५

## कुब्जा

प्रीत माझी रे मोहना
बकुळीच्या फुलापरी
दरवळतो सुगंध
रंगरूप नाही जरी

त्रिकालज्ञ म्हणविशी
तुला नाहीच का ज्ञात
माझी व्याकुळली प्रीत
तुला नाही आकळत ?

कळते रे जगजेठी
सारे जाणते मी मनी
अष्टावक्र अशी कुब्जा
तुझ्या पासंगाला उणी

नको मुरलीचे भाग्य
नाही राधेचाही हेवा
सत्यभामा रुक्मिणीचा
शृंगारही नको देवा

सोळा सहस्त्र नारींना
सारे उपभोगू दे ते
क्षण एक साफल्याचा
फक्त श्रीहरी मागते

डोळे भरून पाहता
रूप भव्य दिव्य तुझे
ओलावतील अश्रूंनी
रुक्ष नयनही माझे

जन्मभरी आहे देवा
जोपासला एक ध्यास
तुझ्या सुकोमल हाते
अश्रू एकदाच पूस
अश्रू एकदाच पूस

## वाट

चिडीचूप जग झालं
झालं सारं सुनसान
झाडापेडानं मिटलं
एक एक फूल पान

अंगभर कांबरूण
अंधाराचं पांघरून
निजे शिवार–माऊली
पीक कुशीत घेऊन

शाकारल्या कुडामधे
टिमटिमते टिमणी
वाट पाहते धन्याची
एक मिटली जिवणी

गेला ' शेरा ' ला दुपारा
लगबग घरधनी
अजून ना परतली
त्याची खिलार दमणी

झोका झोळीला देताना
वाजेसुभग कंकण
वाट पाहून थकले
पेंगुळलेले नयन

जेव्हा वाजले घुंगरू
बांधापासल्या पांदीत
अडे आतुर पाऊल
झोपडीच्या उंबऱ्यात

## तू

तुझा अथांग सागर
तुझे मेघांचे भांडार
तुझे असू दे तुझ्याशी
माझा माध्यान्ही अंगार

एकटी वाट चालताना
सावलीला मेघ दे
निष्फळत्या आसवांना
फक्त तुझा हात दे

## पहाट

पश्चिमरेखी शुक्र चांदणी
पूर्वा केशर उधळी
अजून नसल्या रविबिंबाची
अवचित जाणीव झाली

हरित प्रफुल्लित अवनीवरती
धूसर नभ अवतरले
क्षितिज कुठे ना उरले आणिक
मन धरणीचे फुलले

## रिक्त

उष्ण श्वास-निःश्वासाची
अशीं भिजली दंवांत
प्राजक्ताच्या सुगंधाची
केली साजरी पहाट

दिमाखाचे, वैभवाचे
माझ्या आयुष्याचे क्षण
तुझ्यासाठी तुझ्यासाठी
होते ठेवले जपून

होते नव्हते ते सारे
सारे ओंजळ भरून
नव्हते का उधळले
तुझ्या पावलांवरून

नको आता बोलावूस
रिता घडा आता झाला
नको गालबोट लावू
काठोकाठल्या सुखाला

उन्हे कलल्यावरती
आर्त साद नको घालू
काजळल्या क्षितिजाशी
व्रण लागेल उमलू

## दुपार

वैशाखाच्या ऐन दुपारी
गपचिपलेल्या कडेकपारी
एक भिंगरी

घेऊन गिरकी, ऐशी फिरकी
रुमझुम 'गाऊन' गाता नाचून
तोल सावरी

राघू मैना पिंपळपाना
देऊन झोका घेऊन ठेका
घेत भरारी

साळुंखीचे पंख जरीचे
मखमालीचे अंग चिऊचे
निळ्या नभावर नक्षी कोरी

बगळे सगळे एका माळे
आकाशाच्या भोर अंगणी
रांगोळीही काढीत न्यारी

वैशाखाचे अनुपम वैभव
अशी न्याहाळी उत्सुक नयने
ग्रामीण गोरी
गोरी गोरी
वैशाखाच्या ऐन दुपारी

## दिपूच्या कविता

१

तुझ्या सोन पावलांनी, घर आज हे पावन
नाद तुझ्या वाळियांचा, हरपवी तनमन

रेशमाचे तुझे हात, माझ्या गळ्यात पडता
आयुष्याची खरीखुरी, आज झाली ग सांगता

तुझ्या मृदु ओठाआड, अवघे मांगल्य दडले
रत्ननयनी तुझिया, विश्व नवेच वसले

पंचप्राणांची माझिया, करीन ग पखरण
हृदयाच्या गाभाऱ्यात, तुला जपून ठेवीन

२

माझ्या ग अंगणात फुलली जाई-जुई
नाजुक लेक माझी दिपूताई

नाहाते दिपू माझी झाडाला पाणी जातं
शेवंती रंगवीतं हळदीनं

सुवासिक तेल माखते सोनसळी
गुलाबाची कळी दिपूताई

बाग मी लावली पिकलं ग तोंडलं
मन हे फसलं हसे दिपू

कवळं ग डाळींब शुभ्र दाणा दिसे
की ग दिपू हसे समजेना

## विन्मुख

कबूल, कधी पेटली होती
लाख लाख निरांजने
श्वासांनीच श्वासांना
दिली घेतली आश्वासने

क्षितिजाशी मावळतीच्या
टेकताना तेजोगर्भ
माझ्या साऱ्या आयुष्याचं
वाहिलेले तुला अर्घ्य

विरघळलेल्या अस्तित्वाला
नाही सल नाही काटा
माझ्या हातांनी मिटल्या
अवघ्या सुखांच्या मी वाटा

## अभिसारिका

वसंतातल्या धुंद फुलांचा बहर हवा मज
आषाढातील जलधारांचा कहर हवा मज
वस्त्र म्हणुनिया सरितेच्या लाटांची सळसळ
तृणांकुरांची तटतटली चोळी वक्षावर

मयूर शिकविल पदन्यास नृत्याचे चंचल
करीन चपल बिजलीला मी पायातील पायल
माळीन भाळी बिंदी म्हणुनी पूर्ण चंद्रमा
गालावरती क्षितिजीचा चढवीन रक्तिमा

तळहाती रंगवील मेंदी सखयी वनिता
गुलाब लाविल सुबक चपल चरणांना अळिता
रानफुलांच्या गुंफिन सुंदर सुंदर माला
शततारांचे ते अलंकार मजला कुणि घाला

नटुनी थटुनी जाईन मी हिमशिखरी आता
हिमगिरीची कन्या सांगुनिया आले मी ताता
मी वरिला, पुजिला त्रिनेत्र शंकर बाई
भिल्लीण सजून मी मोहविण्या त्या जाई

## तुझा सहवास

तुझ्या सहवासाचे मोती
क्षण-क्षण वेचताना
भान हरले हरले
तुझे शब्द ऐकताना

तुझा एक-एक शब्द
परिजातकाचे फूल
त्याच्या कोवळेपणाची
पडली रे गंधभूल

शब्द शब्दांत गुंफून
एक बनवून झुला
कधी सुख, कधी दुःख
इन्द्रधनुष्यी टांगला

## तान्हुल्यास

नीज माझ्या तान्हुल्या रे
नीज माझ्या तान्हुल्या

दिशा-दिशा रे दाटल्या
साऱ्या भागल्या सावल्या
बघ निःश्वासल्या कळचा
उमलून पाकळचा

नको नाचवूस हात
नको देऊस हुंकार
बघ झोपेने पापण्या
किती किती ओथंबल्या

गोड गोजिऱ्या कळीत
हसू का रे घुटमळे ?
पऱ्या नाचऱ्या स्वप्नात
भूवरी का पातल्या ?

नक्षत्राच्या चांदण्यात
तेवली रे ज्योत ज्योत
बघ झिम्मा फुगडीत
तारका या रंगल्या

चिऊ काऊच्या घासांचे
तुझ्या ओठांत अमृत
हळुवार टिपते मी
ओठांच्या या पाकळचा

## अमुचे गान

एकमुखाने स्त्रीमुक्तीचे गान अता गाऊ
तोडुनिया रूढीचे बंधन रणचंडी होऊ

देह जयांचे बलात्कारिले
अवमानुनिया जया त्यागिले
त्या अबलांचे अश्रू पुसण्या सिद्ध अता होऊ

मांडुनिया बाजार जयांचा
सौदा झाला स्त्री देहाचा
लढू तयांच्या सुटकेसाठी अभय तयां देऊ

फेकू जोखड दुष्ट प्रथांचे
उठवू वादळ चैतन्याचे
मानवतेचे हक्क मिळवण्या सिद्ध आता होऊ

महागाईचा मारू आसूर
बदलू जीवन सारे अस्थिर
निजलेल्या राजांचे आसन गदगद हे हालवू

आम्ही ठरवू वारस अमुचे
अद्‌भुत पुतळे मानव्याचे
समानतेच्या नव्या युगाचे वचन आम्ही देऊ

समाज ज्या दलितांस ठोकरे
दु:खी ती अमुचीच लेकरे
विश्व व्यापुनी मातृभाव तो दशांगुळे उरवू

## अंबापुरीची प्रभात

क्षितिजावरच्या नीलिम्यातुनी
सूर्य तांबडा वरती येई
तांबुस पिवळी किरणे अपुली
आकाशामधी मिसळुन देई

खळखळणे विसरून थांबली
जयवंती अन् आपोआप
सळसळणे, भिरभिरणे नाही
वायू घेई का साखरझोप

पाऊलवाटेवरती जगती
गाईगुरांसह पोरे काही
हलक्या फुलक्या फुंकरीने परी
अलगुज त्यांचे भरले नाही

कुणी गृहलक्ष्मी दुधातुपाने
अभिषेकिते मुकुंदराजा
प्रशांत नीरव सगळे काही
दिसे न कसला गाजावाजा

जणू हे मिटले अर्धेउमले
बांधावरले रानफूल ते
अंबापुरीची प्रभात तद्वत
हलके हलके रोज उमलते

## हिरवा चुडा

आज भरला हिरवा चुडा
काजळकाळी डोळ्यांत आसू
डोई माळला केवडा
हिरवा शालू कसा नेसू

ओढ लागली जिवाला
अंतरपाटा पल्याडची
कशी विसरू माहेरा
माया तुटेना आईची

आज भरला हिरवा चुडा
सखी कृतार्थ मी झाले
गोड चाहूल लागता
भान विसरून गेले

मला पुसती डोहाळे
आई बाबा ताई भाऊ
वहिनीबाईंची धांदल
कशी वन्संना सजवू

आला सोनियाचा दीस
मला पावला ग देव
माझ्या कुशीमधे आज
खेळे चिमणासा जीव

आज भरला हिरवा चुडा
माझ्या लेकाचे लगीन
वरमाई सजले मी
माझे मोहरले मन

हिरवा चुडा लेवूनिया
सूनबाई माझी आली
करी खाली वाकुनिया
नमस्कार सोनसळी

काय देऊ आशीर्वाद
औक्षवंत हो लाडके
हिरवा चुडा पुन्हा भर
कोंभ नवा आण सखे

## बाळकृष्ण

गौरीहराच्या समोरचा
बाळकृष्ण मी पुजला
तुझ्या सवे येताना तो
बरोबर मी आणला

तोच बाळकृष्ण मला
स्वप्नामधे दिसला
तोच गुलाम आज माझ्या
कुशीमधे हसला !

## आस

शांत शांत सरितेच्या
मंद मंद लाटा
ती निंबाची चंद्रापुढे
झुकलेली फांदी

रुपेरी ती वाळू आणि
चंदेरी त्या वाटा
तुझ्या माझ्या मनाला रे
आणतात धुंदी

उंच-उंच माडांचीही छोटी-छोटी पानं
भुईशी रेखती सुबकशी रंगावली
धुंद तन-मन तुझ्या स्कंधावर मान
मनामधे मीलनाची आस पालवली

वाचनालय ठाणे
वा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

## मनमोहना

आठवते का तुला मोहना
रंगबावरी राधा गवळण
भुलली गुंजारवास, भृंगा
कोमलदल ती भोळी कमळण

आठवते का वृंदावनीची
रास रंगली जलात भिजली
सचैल न्हाली आठवते ना
ओली राधा तुला बिलगली

श्रावणसर ती आठवते का ?
भिजवून गेली जी दोघांना
की आठवते चांदणेच ते
माखुन गेले दो अंगांना

यमुना तट तो आठवतो का
मीच जिथे रे बनले कृष्णा
तुझियामध्ये मिसळुन ' मी 'पण
प्रीतीची शांतवली तृष्णा

स्मरतच का हे नाही सारे
मीच रे तुझी खुळी प्रेमिका
तव प्रीतीच्या रंगी रंगले
मीच मीच रे तुझी राधिका

कल्पांताची वाट पाहाते
दयाघना रे दया दाखवी
व्याकुळनेत्री जमले अश्रू
किती तुझी रे वाट पाहावी !

## नाते

मिठीत तुझिया दरवळतो परिमळ सुमनांचा
चंदनवेढा मजभवती तव करकमलांचा

रानफुलांची अशी साजरी करुनी शेज
तुझ्यासंगती युगे-युगे रे घ्यावी नीज

ऐहिक दुःखे सुखेही यांचा पाश नसावा
स्वप्नफुलांचा हिंदोळा रे उंच चढावा

कधी वरती अन् कधी खाली तो असा झुलावा
संथ लयीचा डोळ्यांवरती कैफ चढावा

राज्य असावे स्वप्नमंदिरी रे दोघांचे
असे ताटवे तिथे फुलावे भावफुलांचे

अतूट नाते तिथे जुळावे असे आपुले
दिनरात्रीचे माप जरी रे तिथे संपले

जीवन-मरणाचाही जेथे विसर पडावा
असा सोहळा अपूर्व तेथे नित्य घडावा

## आठव

आली तेजाळ सकाळ
सारी धांदल-धांदल
थांबायाला नाही वेळ
माझं काम खोळंबलं

करुनिया शुभस्नान
दिवसाचा रे प्रारंभ
चहापाणी आटोपलं
करी रांधाया आरंभ

आला गेला सांभाळिते
गृहिणीचे रे अगत्य
मन रमूनिया जाते
करता हे गृहकृत्य

होई संध्याकाळ आता
जो तो आपल्यात दंग
क्षण येता विसाव्याचा
मन उदास का सांग

दाटल्या या सांजवेळी
सख्या तुझी आठवण
माझ्या मनाचा व्यापते
असा का रे कण–कण

कुठे असशील आता
काय करिसी बापडा
माझ्या भरल्या संसारी
हाच मिठाचा रे खडा

## प्रेमब्रह्म

निमुळती मऊ बोटे पयभारे कांस दाटे
कांस–बोटांचा संगम दूध झुरुमुरु सुटे

भरलेल्या चरवीला मिळे शिक्याभध्ये जागा
सरू लागली पहाट बाळ होऊ लागे जागा

डेरा नक्षीदार मोठा दह्या-दुधाने भरला
नृत्य चालता रवीचे नवनीत होते गोळा

दळू लागली माऊली घेती आकार भावना
एक-एक ओवी म्हणे ' ऊठ देवकीनंदना '

गोड भूपाळी ऐकून बाळ हलके उठला
दृष्टी पडे नवनीत त्याचा जीव हरखला

' कसे संपले रे लोणी ?' असे मातेने म्हणता
' नाही ' मानेने म्हणतो नच मुख उघडिता

बळे धरून आईने उघडिलेच वदन
मृदु ओठ विलगले झाले ब्रह्मांड दर्शन

हरखली ती माऊली धरी उराशी बाळाला
म्हणे व्हावे जन्मोजन्मी आई तुझीच रे बाळा

माझ्या मातृत्वाचे लोणी पुन्हा-पुन्हा तू चोरावे
प्रेमब्रह्माचे दर्शन पुन्हा-पुन्हा मला व्हावे

## बाळ

सागरा तुझे अमोल
नको रत्न आज मला
नयनांचे दोन नीळ
बाळराजा दावी मला

गोऱ्या-गोऱ्या मुखड्याची
नको चंद्रा ऐट दावू
मुखचंद्रमा बाळाचा
तिथे तुला का रे पाहू

वेलीबाई ऐट नको
फूल तुझेच का हसे
हास्यवदन बाळाचे
बघ फुलले हे कसे

माझ्या बाळराजा विना
मला बाई नको काही
छंद एक त्याचा लागे
दुजे सुचेनासे होई

घेऊ जावळाचा पापा
उडे कसे भुरभुर
याचे कौतुक करता
देतो नाजुक हुंकार !
देतो नाजुक हुंकार !!

## अशी कशी प्रीत

अशी कशी रे प्रीत आपुली सदाकदा भांडते
प्रीतीचा गुलमोहर सगळा तोडुनिया टाकते

घरातुनी तू निघुनी जाता क्षणही न गमते मला
दृष्टी पडशी जेव्हा तेव्हा क्रोधही येतो भला

मी रुसल्यावर असे वाटते समजूत तू काढावी
मधु बोलावे खुशीत आणण्या वेणी नजर करावी

युगा-युगांचा चालत आला अहंपणा तो पुरुषी
शब्द मुखातून उणाच जाता किती अबोला धरशी

मीच शेवटी हार मानुनी विनवायाला तुला
येते विसरुन मानपान अन् तोडते अबोला

इतुक्यानंतर भरते येते प्रेमाला तुझिया
आलिंगुनिया कुजबुजशी गूज कानी सखया

म्हणशी मजला ' राणी चुकलो,
करिशी ना मज क्षमा ?'
खिडकी मधुनी मिष्किल हसतो धवल पूर्ण चंद्रमा

ठाऊक असते गंमत त्याला माझिया मनातली
हार जरी रे पत्करली तरी बाजी मी जिंकली

## असाच हवास

कधी उगाच रागवतोस
ताडतोस शब्दांनी
अगदी विद्ध करतोस
तिरस्कारी दृष्टीनी

क्षणांत सारे विसरतोस
अनुनयी शब्दांनी
घालतोस फुंकर
घायाळलेल्या मनावर

कोसळते मी तेव्हा
तूच असतोस आधाराला
तुझीच प्रेमळ छाती असते
श्रमल्यावेळी विसाव्याला

चोचीत चोच घालून
प्रणयही तूच करतोस
मात्र कधी कधी अगदी
मुलाहून मूल होतोस

तूच आहेस घरचा स्वामी
तुझ्या हाती सुखमंत्र
आपल्या या घरकुलावर
तुझे सावलीला छत्र

शतजन्मी प्राणप्रिया
तुझा लाभावा सहवास
सख्या असाच अस
असाच हवास !

## माझ्या मनाच्या विसाव्या

माझ्या मनाच्या विसाव्या माझी जप रे भावना
माझ्या स्वप्नाळू मनाची तुला येऊ दे कल्पना

धसमुसळा शृंगार तुला, मला जरी हवा
घ्यावा वाटतो पहाटे तुझ्या कुशीत विसावा
तुझ्या दारीची मी वेल जरी नाही रे फळले
अंगोअंगी चाहुलीने तुझ्या नाही का फुलले ?

तुझ्यासाठी रमले ना तुझ्या दहा माणसांत
सोडलेस सगळ्यांना तुझी केली ना मी साथ ?
घरकुल उभारले तुझे माझे ते साजरे
सजवले नटवले रोज तुझ्यासाठी ना रे ?

रोज संध्याकाळी वाट पाही दारी उभारून
मला कळते रे येशी कसा दमून भागून
नाही फाराची अपेक्षा माझ्या मनाच्या विसाव्या
सुख व्यथा रे आपण एकमेकां द्याव्या घ्याव्या

तुझ्या चिंता मला सांग थोडे हलके होईल
माझे वात्सल्य नी प्रीती तुला दिलासा देतील
उणीवेचे दुःख माझ्या तुला सांगीन सगळे
ठेव माथ्यावर हात बांध होऊ दे मोकळे

आधाराला येता तुझ्या नको कुशीस वळूस
नकळत नको असा घाव जिव्हारी घालूस
कधी बसता उदास हाती हात तू घ्यावास
जीव नाही का लागत असे प्रेमे म्हणावेस

डोळा आले जरी पाणी पुसावेस ते हाताने
नको दबवूस दुःख माझे डोळयांच्या धाकाने
अश्रू येऊ दे लोचनी नको धरू त्याचा राग
कसे होईल मोकळे दुःख त्याच्या विना सांग

जगी तूच एक माझा कुणापाशी मी रडावे
सुख दुःख मनीचे रे सांग कुणाला सांगावे ?
वेली वेलीला असते सख्या सृजनाची ओढ
फूल जरी तिला आले फळ लागावे रे गोड

फूल फुलणे माझेच माझे मला जड होई
रंग-गंधासह व्यथा आज तुझ्या हाती देई
माझ्या मनाचा हा सल सख्या तुलाच जपणे
तुझ्या हाती आहे आता कोसळता सावरणे

## शरणागत

बघ, जिंकल्या जिवाला पुन्हा पुन्हा जिंकू नको
ओढ लागल्या जिवाला पुन्हा वेड लावू नको
लाल अधर विलगून कुंदकळ्या दावू नको
निमुळत्या हनुवराला तीळ काळा झाकू नको

बांधलेला कचपाश मोकळा हा सोडू नको
रेशमाचे काळे जाळे माझ्यावर फेकू नको
गंधभरल्या फुलासारखी अशी पुन्हा फुलू नको
सुगंधाचे हात असे पुन्हा-पुन्हा पालवू नको

चंद्रकोरी पावलांचे नृत्य मला दावू नको
पुन्हा पुन्हा अनामिका अशी दाती धरू नको
नको उचलू भिवई तीर असा सोडू नको
पापणीच्या शिंपातले काळे मोती दावू नको

दान नसता द्यायाचे उगा आशा लावू नको
प्राण घेण्याआधी माझा खेळ असा करू नको
बघ, जिंकल्या जिवाला पुन्हा पुन्हा जिंकू नको
ओढ लागल्या जिवाला पुन्हा वेड लावू नको

## तुझा काही दोष नाही

शिखरावरच्या कळसासारखा दिमाखानं
आभाळात तळपत होतो वैभवानं
पायरीच्या दगडासारखा लेखून गेलीस
चढता चढता सहज पाय ठेवून गेलीस

नक्षत्रांच्या लेण्यासाठी केलास सोपान
वेडा मी मात्र गातोय् तुझेच गान
तरी विलोल डोळ्यांनी दिले होतेस इशारे
तुझ्या हृदयाचे मार्ग आडवळणी अंधारे

अमृतातच असतो कधी हलाहालचा थोडा अंश
केतकीच्या आडच होतात नागिणीचे जहरी दंश
तरी कळलेच नाही असा कसा वहावत गेलो
मृगजळ हे उमजूनही मागे-मागे धावत राहिलो

दिमाखाने आरूढलो भरतीच्या लाटे वरती
थांबणारच हे उधाण ही बाळगलीच नाही क्षिती
ओसरली लाट आता गाळही शिल्लक नाही
झाले व्हायचे जे होते तुझा काही दोष नाही

## मला पुसशील तर –

मला पुसशील तर
माझें दु:ख आवडते
क्षणभंगूर सुखापेक्षा
दु:ख चिरंतन असते
दु:ख झिरपावे मनी
दु:ख जपावे उरात
वेदनेचा घुसलेला
तीर असावा मनात
शमताच ती वेदना
उठे सुखद जी कळ
झिंग तिची मदिरेची
आणी सोसण्याचे बळ
घाव शंभर सोशीन
आपल्यांचे परक्यांचे
एक–एक मिरवीन
आणि बिरूद मानाचे
तुझ्या उपेक्षेचे सुद्धा
माझ्या पदरांत मोती
तुझा शंभरावा घाव
मला नाही त्याची क्षिती

## खरंच का तू गेलीस !

खरंच का तू गेलीस ...
अजून बघ ताजा आहे
संध्याकाळचा गजरा
अजून डोळ्यांसमोर आहे
भाव-व्याकूळ नजरा
कालचेच तर हे सारे
खरंच का विसरलीस
खरंच का तू गेलीस...
कालच तर टाके घातलेस
माझ्या उसवल्या वस्त्राला
संयमानें शिवलास माझा
फाटका संसार
आभाळच फाटल्यावर
कशी पाठ फिरवलीस
सहचरीची सात पावलं
अन् आईचं हृदय घेऊन
दारीचं माप लवंडलंस
पण फुटका घट भरताना
दमलीस श्रमलीस
म्हणून का कंटाळलीस
खरंच का तू गेलीस ?

## मृत्यूस

तुझ्या मिठीतून हळूच निसटून
जगांत आले कुतूहल वाटून
मानवयोनी जन्म घेतला
चौऱ्यांशींच्या नंतर मागून
कितीक दिसली प्रलोभनांची
फूलपाखरे रंगित-रंगित
किती हुंगली पुष्पे गंधित
किती ऐकले सुमधुर संगित
किती भोगली शृंगाराची
पुनः पुन्हा मी अवीट गोडी
किती घातलो कितीक सुटली
तारुण्याची सुंदर कोडी
किती लोळले मंचकावरी
ऐश्वर्याच्या ऐषारामी
व्यवहारी या कितीक दिसली
चलनामधली खोटी नाणी
किडे पाहिले वळवळणारे
रक्त पिपासू आणिक राक्षस
लाचारीनें जगणारे अन्
यती पाहिले कितीक तेजस
सारे करूनी थकले आता
शिणली गात्रे शिणली काया
मिठीत घेरे मृत्यो मजला
नको घालवू क्षणही वाया

## सावली

सावली वेडी आहे !
प्रकाशानं टाळलं तरी
त्याच्या मागे जाते आहे
प्रकाशाची नजर जाताच
कुठें दडून बसते आहे
सावली वेडी आहे !

सावली भोळी आहे
लहान-मोठें राव, रंक
तिला सारे सारखे आहे
कुणाच्याही संगतीत
बिचारी रमतें आहे
सावली भोळी आहे

सावली मिष्किल आहे
माणसाच्या मागे जाऊन
शहाण्यांना भिववते आहे
वेडेवाकडे आकार घेऊन
मुलांना हसवते आहे
सावली मिष्किल आहे

सावली अमर आहे
प्रकाशाच्या इतकीच आदिम
काल होती उद्या असणार
प्रकाशाच्या इतकीच अटळ
ग्रहगोलांबरोबर फिरणार
रोज नवा आकार घेणार
असणार नसणार, नसणार असणार
सावली अमर आहे !

## तिची कविता

एक पाय अलीकडे
दुजा मरणाच्या दारी
आशा निराशेचे रंग
सारे गढूळले उरी
आला समाचारा भाऊ
भावजय बरोबरी
म्हणे रुक्मिणी सवेत
आला पाठीराखा हरी
शब्द टिपतात कान
डोळें शोधतात धीर
सत्त्व हारली रुक्मिणी
बोल बोलली कठोर
अटीतटीच्या क्षणाला
तोल रुक्मिणीचा ढळे
'देणें हातोहात द्यावे
भोगा पापाची ही फळे'
झुकलेल्या पापणीत
तळी तुडुंब भरली
सांडतेली अश्रूसर
संयमाने परतली
ओठ प्रसन्न हासले
माया बहिणीची म्हणे
भाऊराया आयुष्याचे
तुझ्या होऊ दे रे सोनें
वाचा वदे आशीर्वच
जरी जाता माझा जीव
विझू विझू झाले तरी,
माझ्या ओठी तुझे नांव

## फक्त तुलाच

काळे आणिक पांढरे
पंख काळ–पक्षियाचे
क्षण उडती मिटती
एक–एक दिवसाचे
असा एक–एक दीस
तुझी मोहरू दे स्वप्ने
हर्ष उत्कर्ष सुखानें
घर फुलू दे चिमणे
प्रति वर्षात असू दे
तुझे उज्ज्वल भविष्य
तुला आणिक लाभू दे
माझे उरले आयुष्य.

## आश्वासन

प्रणयाचा चंदनधूप
विरहाने पेटलेला
कण-कण जळताना
अस्तित्वच नुरलेला
आता माझ्या मनामधे
धुराचेच एक वलय
शरीरात उफाळलेला
सुगंधाचा एक प्रलय
प्रलयाच्या लाटेवरती
आठवणींचे पिंपळपान
जरी अंतरलेले स्पर्श
जिते जागते एक भान
जरी मधें अंथरलेले
दऱ्या-दऱ्यांचे गालिचे
मळे शिपले दंवानी
लक्ष-लक्षजीवनाचे
गंध मातीत मिळता
उमटली एक खूण
अवघ्या देहातून माझ्या
एक मिळे आश्वासन

REFBK-0024514
REFBK-0024514

२५२१
२४५१५